सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक:१६/आस्था/प्रशिक्षण/२०२३/१५२ दिनांक:०७.०६.२०२३

कार्यालयीन आदेश

**पहा: या संचालनालयाचे पत्र क्र.१६/आस्था/प्रशिक्षण/२०२२/१४५, दिनांक ५.५.२०२२.**
**संदर्भ: सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.विपधो २६२०/प्र.क्र.१६/का.१७, दि.३१.३.२०२१.**

या संचालनालयातील तसेच संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि विभागीय कार्यालयामधील कार्यरत लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या विभागीय पर्यवेक्षीय प्रशिक्षण **दिनांक २०.६.२०२३ ते २९.७.२०२३ (४० दिवस) (रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून)** या **कालावधीत शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती** या संस्थेत आयोजित करण्यात येत आहे. तसेच सदरचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर **दिनांक ३१.७.२०२३ ते ३.८.२०२३ रोजी परीक्षा आयोजित करण्यात येत आहे.** विभागीय कार्यालयांर्तगत असलेल्या कर्मचाऱ्याचे विभागीय पर्यवेक्षकीय प्रशिक्षण व परीक्षा आयोजित करण्यात येत आहे. सदर प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आलेल्या विभागीय कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर विभागातील कर्मचाऱ्यांची यादी सोबत जोडत आहे.

**सामान्य प्रशासन विभाग शासन शुध्दीपत्रक क्र:संकीर्ण-२३१८/प्र.क्र.३/का.१७, दिनांक ११.८.२०२२ नुसार** विहित निकषाच्या आधारे जे कर्मचारी प्रशिक्षणास पात्र आहेत, परंतु त्यांच्या नावाचा समावेश सदर प्रशिक्षणासाठी झालेला नाही, त्यांनी प्रशिक्षणासाठी नाव समाविष्ट होण्यासाठी संबंधित विभागीय कार्यालयामार्फत तात्काळ या संचालनालयास अर्ज सादर करावा.

संबंधित कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, प्रशिक्षण झाल्यापासून सलग तीन परीक्षांमध्ये जर संबंधित कर्मचारी उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर त्यांची सेवाजेष्ठता गमावली जाईल याची नोंद घ्यावी. तसेच त्यांच्या वार्षिक वेतनवाढी देखील रोखल्या जातील. प्रशिक्षणास / प्रशिक्षणानंतर होणाऱ्या परीक्षेस गैरहजर असणे हे सुध्दा परीक्षा उत्तीर्ण होण्याची एक संधी गमावली असे समजण्यांत येईल.

सर्व संबंधित कार्यालयप्रमुख / संस्थाप्रमुखांना कळविण्यांत येते की, त्यांच्या अधिपत्याखालील काम करीत असलेल्या सोबतच्या यादीतील कर्मचाऱ्यांना **शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती येथे दिनांक २०.६.२०२३ पासून सुरु होणाऱ्या प्रशिक्षणास सकाळी १०.०० वाजता हजर रहाण्याच्या सूचना** देऊन त्यांना, कार्यालयातून / संस्थेतून कोणत्याही परिस्थितीत प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त करावे.

संबंधित कर्मचाऱ्यांना स्पष्ट जाणिव करुन द्यावी की, हे प्रशिक्षण व परीक्षा त्यांच्या जेष्ठतेशी निगडीत आहे. त्यामुळे त्यांनी प्रशिक्षणास उपस्थित रहाणे नाकारल्यास व त्यामुळे त्यांच्या जेष्ठतेसंदर्भात व पदोन्नती संदर्भात काही विपरीत परिणाम झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्याची स्वत:ची राहील. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी वेळेवर उपस्थित राहता यावे यादृष्टीने त्यांना कार्यमुक्त करण्याची जबाबदारी संबंधित संस्थाप्रमुख / कार्यालय प्रमुखांची राहिल. प्रशिक्षणासाठी लागणारी वेगवेगळी पुस्तके व इतर साहित्य कर्मचाऱ्यांनी स्वत:च उपलब्ध करुन बरोबर आणावे.

कृ.मा.प.

प्रशिक्षणासाठी अमरावती बाहेरुन येणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहिल व तो त्यांच्या कार्यरत संस्था / कार्यालयामार्फत दिला जाईल. प्रशिक्षण कालावधीत कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारची रजा अनुज्ञेय राहाणार नाही.

टीप:- प्रशिक्षण कालावधी व परीक्षेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील:-

**१) प्रशिक्षण कालावधी: दिनांक २०.६.२०२३ ते दिनांक २९.७.२०२३.**

**२) परीक्षा : दिनांक ३१.७.२०२३ ते दिनांक ०३.८.२०२३.**

३) प्रशिक्षण व परीक्षेचे ठिकाण- शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती.

४) प्रशिक्षणासाठी येणाऱ्या प्रशिक्षणार्थींना कळविण्यात येते की, त्यांच्या निवासाच्या व्यवस्थेसाठी सहसंचालक, विभागीय कार्यालय, अमरावती यांच्याशी दिनांक १४.६.२०२३ पर्यंत संपर्क साधून तसे लेखी कळवावे. त्यांनतर संपर्क साधणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या रहाण्याच्या सोयीबद्दल विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
प्र.संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:-

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई /पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर या विभागीय कार्यालयातंर्गत असलेल्या कर्मचाऱ्यांना या आदेशाची प्रत आपल्या कार्यालयातुन पाठविण्यांची व्यवस्था करावी. तसेच शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती येथे आयोजित केलेल्या प्रशिक्षणासाठी वेळेवर हजर होण्यास कार्यमुक्त करावे. उपरोक्त प्रशिक्षणाची संपूर्ण जबाबदारी सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांची राहील. त्यांनी प्रशिक्षकांची निवड करणे व प्रशिक्षण पूर्ण करणे इत्यादीबाबतची कार्यवाही त्यांचे स्तरावरुन करावी.

२) सर्व प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने / शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व इतर तत्सम संस्था (विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर अंतर्गत.)

३) उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, पुणे / औरंगाबाद / नागपूर.

४) संबंधित व्यक्ती (संबंधित संस्था /कार्यालयप्रमुखामार्फत)

५) कार्यासन क्र१२, मुख्य कार्यालय,मुंबई यांना योग्य त्या तात्काळ कार्यावाहीसाठी

६) कार्यासन क्र६, मुख्य कार्यालय,मुंबई यांना योग्य त्या तात्काळ कार्यावाहीसाठी

(सन - २०२३)

प्रपत्र- ब

परीक्षेचेनाव :- पर्यवेक्षकीय परीक्षा

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नाव | पदनाम | संस्था / कार्यालय |
|---|---|---|---|
| | तंत्र शिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई | | |
| १. | श्री. सुधीर एकनाथ दिवटे | लिपिक टंकलेखक | मुख्य कार्यालय, मुंबई |
| २. | श्री. रामकिशन ज्ञानोबा गवळी | लिपिक टंकलेखक | मुख्य कार्यालय, मुंबई |
| ३. | श्रीमती स्वाती भूषण सोनवणे | लिपिक टंकलेखक | मुख्य कार्यालय, मुंबई |
| ४. | श्री. श्रीकांत राजू गुल्हाने | लिपिक टंकलेखक | मुख्य कार्यालय, मुंबई |
| ५. | श्री. अशोक बाबुराव कंकाळ | लिपिक टंकलेखक | मुख्य कार्यालय, मुंबई |
| विभागीय कार्यालय, मुंबई | | | |
| ६. | कुमारी शितल नामदेव चव्हाण | कनिष्ठ लिपिक | सहसंचालक, तंत्रशिक्षण, वि.का. मुंबई |
| ७. | श्री. सुरेंद्र नाना मेहेर | कनिष्ठ लिपिक | सहसंचालक, तंत्रशिक्षण, वि.का. मुंबई |
| ८. | श्री. राजेश वसंत देशमुख | लिपिक टंकलेखक | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे |
| ९. | श्री. आप्पा कृष्णा हेमाडे | लिपिक टंकलेखक | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे |
| १०. | श्री. अजित मोहन जाधव | लिपिक टंकलेखक | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे |
| ११. | श्रीमती वंदना दिपक बेलोसे | लिपिक टंकलेखक | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे |
| १२. | श्री. ईश्वर धनसिंग चव्हाण | लिपिक टंकलेखक | शासकीय तंत्रनिकेतन, विक्रमगड |
| १३. | श्री. सचिन वसंत पोकळे | वरिष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन, पेण |
| १४. | श्री. सागर मारुती बादल | लिपिक टंकलेखक | शासकीय तंत्रनिकेतन, पेण |
| १५. | श्री. केदार मनोहर लोंढे | वरिष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी |
| १६. | श्री. श्रीकृष्ण मधुसुदन कोतावडेकर | कनिष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी |
| १७. | श्री. अनिल कचरु परसे | लिपिक टंकलेखक | शासकीय तंत्रनिकेतन, मालवण |
| विभागीय कार्यालय, पुणे | | | |
| १८. | श्रीमती आरती दिवाकर जोशी | वरिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर |
| १९. | श्री. संदिप अशोक भागवत | कनिष्ठ लिपीक | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) |
| २०. | श्री. सार्थक संजय भारती | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी **( प्रशिक्षणची दुसरी संधी )** |
| २१. | श्री. समिर रफिक शेख | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर **( प्रशिक्षणची दुसरी संधी )** |
| विभागीय कार्यालय, नाशिक | | | |
| २२. | श्री. कैलास कडु कोळी | कनिष्ठ लिपीक | शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,जळगाव |
| २३. | श्री. अमिन जमीर तडवी | कनिष्ठ लिपीक | शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,जळगाव |
| २४. | श्री. दिनेश उत्तमराव मोहोटे | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन, अहमदनगर |
| २५. | श्री. ज्ञानेश्वर जनार्दन जगधने | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन, अहमदनगर |
| २६. | श्री. रोहिदास सुभाष देवरे | कनिष्ठ लिपीक | शि.म.दा.रा.शासकीय तंत्रनिकेतन,धुळे |
| २७. | श्री. ज्ञानेश्वर श्रीराम मोरे | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन, नंदुरबार |
| २८. | श्रीमती रजनी नरेश सावळे (अंभुरे) | कनिष्ठ लिपीक | विभागीय कार्यालय, नाशिक **( प्रशिक्षणची दुसरी संधी )** |

| विभागीय कार्यालय, नागपूर | | | |
|---|---|---|---|
| ६७. | श्री. सुमित यशवंत चवरे | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन आर्वी |
| ६८. | श्री. राकेश विठ्ठल भिंगेवार | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन साकोली |
| ६९. | श्री. प्रफुल्ल रमेश चौधरी | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन नागपूर |
| ७०. | श्री. ईश्वर रामाजी बावणे | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन नागपूर |
| ७१. | श्री. संजय रामभाउ रणदिवे | कनिष्ठ लिपीक | शासकीय हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरिंग टेक्नोलॉजी नागपूर |
| ७२. | श्री. प्रविण जनार्धन शंभरकर | कनिष्ठ लिपीक | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय चंद्रपूर |
| ७३. | श्री. शुध्दोधन दयाळ मडकवाडे | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन गडचिरोली |
| ७४. | श्रीमती सपना सतिश कोवे | कनिष्ठ लिपीक | विभागीय कार्यालय, नागपूर |
| ७५. | श्री. मुखळू नथ्थू ढोक | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन आर्वी. |
| ७६. | श्री. सचिन राजेश्वर नेहारे | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन ब्रम्हपूरी |
| ७७. | कुमारी प्राची राजु इरचलवार | कनिष्ठ लिपीक | शासकीय हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरिंग टेक्नोलॉजी नागपूर |
| ७८. | श्री. मधुकर मोहनसिंग राठोड | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन साकोली |
| ७९. | श्री. निलेश धन्यकुमार माहोरे | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन आर्वी. |
| ८०. | श्री. आशिष् रामभाउ कावळे | कनिष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन,गोंदिया |
| ८१. | श्री. सचिन अशोक गोळे | कनिष्ठ लिपीक | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर |
| ८२. | श्री. निखील नरेंद्र सिडाम | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन ब्रम्हपूरी |
| ८३. | श्री. देवेंद्र किसनराव निंबोरकर | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन आर्वी. |
| ८४. | श्री. उमेश साहेबराव खेकाळे | कनिष्ठ लिपीक | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर |
| ८५. | कुमारी करिश्मा हिरामण राठोड | कनिष्ठ लिपीक | शासकीय तंत्रनिकेतन नागपूर |